

केला आहे. तेजस्विनीने सोशल मीडियावर तनुश्रीवर आणि इतर काही अभिनेत्रींवर उघडपणे



# मेलबर्नमध्ये आमिर खान फडकवणार तिरंगा!

भारतीय सिनेसृष्टीचा प्रसिद्ध अभिनेता आमिर खान ऑगस्ट महिन्यात होणाऱ्या इंडियन फिल्म फेस्टिव्हल ऑफ मेलबर्नमध्ये प्रमुख पाहुणा म्हणून सहभागी होणार आहे. ऑस्ट्रेलियात होणाऱ्या या प्रतिष्ठित महोत्सवात आमिर खान भारतीय तिरंगा फडकवणार असून, त्याच्या 'सितारे जमीन पर'ची खास स्क्रीनिंगही आयोजित करण्यात आली आहे. त्याच्या चित्रपटांनी सामाजिक संदेश, मुलांचे भावविश्व, शिक्षणव्यवस्था यांसारख्या विषयांवर केलेली संवेदनशील मांडणी ही केवळ भारतातच नव्हे तर जगभरातील प्रेक्षकांना स्पर्श करणारी ठरली आहे. महोत्सवाचे संचालक मितू भौमिक लांगे यांनी सांगितले की, "विदेशी भूमीवर तिरंगा फडकवण्याचा क्षण हा केवळ औपचारिक नसून, भारतीय आणि ऑस्ट्रेलियन प्रेक्षकांसाठी एकतेचा आणि अभिमानाचा अनुभव असेल. आमिर खानच्या चित्रपटांचा दृष्टिकोन आंतरराष्ट्रीय स्तरावरही प्रभाव टाकणारा ठरला आहे. त्यामुळे त्याच्या उपस्थितीचा विशेष सन्मान आहे." या महोत्सवात यंदा सुमारे ७५ चित्रपटांची प्रदर्शने होणार आहेत. लिंग, जात, लैंगिकता, अपंगत्व, महिला प्रतिनिधित्व अशा विविध विषयांवर आधारित चित्रपटांचा समावेश या महोत्सवात आहे. याच महोत्सवात १९७१ मध्ये प्रदर्शित झालेल्या प्रेम कपूर दिग्दर्शित 'बदनाम बस्ती' या चित्रपटाचीही स्क्रीनिंग होणार आहे. १४ ते २४ ऑगस्टदरम्यान होणाऱ्या या महोत्सवात, समानता आणि विविधतेच्या मूल्यांना प्राधान्य देत, भारतीय चित्रपट जगभरात कसा आदर आणि विचारप्रवर्तक ठरतो याची पुन्हा एकदा प्रचीती येणार आहे.